अ‍ॅग्रोमेटअ‍ॅडवायझरी बुलेटीन
ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,
कृषि हवामानशास्त्र विभाग
कृषि महाविद्यालय, पुणे ४११ ००५
फोन : ०२०-२९५१६२६४
ई-मेल : amfupune@gmail.com

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०४/०८/२०२६

## जिल्हा : सोलापूर

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (०४/०८/२०२६ ते ०८/०८/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| पाऊस (मिमी) | 9.0 | 7.0 | 3.0 | 4.0 | 5.0 |
| कमाल तापमान (अं.सें.) | 32 | 32 | 33 | 33 | 32 |
| किमान तापमान (अं.सें.) | 24 | 24 | 24 | 24 | 25 |
| ढग स्थिती (आकाश) | 7 | 8 | 8 | 8 | 6 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 90 | 89 | 88 | 86 | 86 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 88 | 87 | 87 | 85 | 83 |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 17 | 18 | 20 | 20 | 20 |
| वाऱ्याची दिशा (अंश) | 264 | 269 | 263 | 269 | 274 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक ०४ व ०८ ऑगस्ट, २०२६ रोजी काही ठिकाणी तर दिनांक ०५, ०६ व ०७ ऑगस्ट, २०२६ रोजी तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे.<br>ईशारा : भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात<br>➢ दिनांक ०४ ऑगस्ट, २०२६ रोजी तुरळक ठिकाणी वादळी वारा (३० ते ४० किमी/तास), मेघगर्जना, विजासह हलका ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे.<br>➢ दिनांक ०८ ऑगस्ट, २०२६ रोजी तुरळक ठिकाणी वादळी वारा (४० ते ५० किमी/तास), मेघगर्जना, विजासह हलका ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस) | | विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र विभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक ०२ ते ०८ ऑगस्ट, २०२६ दरम्यान<br>➢ पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमाल तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे.<br>➢ किमान तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • शेतकरी बांधवांनी पुरेसा ओला व्यावर पेरणी करावी. पेरणी करताना महात्मा फुले कृषि विद्यापीठाने शिफारस केलेली बीजप्रक्रिया करावी.<br>• पेरणी झालेल्या उडीद , मूग , चवळी आणि तूर या पिकांमध्ये एक कोळपणी अथवा खुरपणी करण्याची शिफारस करण्यात येत आहे तसेच रोपांची प्रती हेक्टर योग्य संख्या राखण्यासाठी विरळणी करावी.<br>• खरीप हंगामातील रिकाम्या जमिनीत (नापेर) मूलस्थानी मृद व जलसंधारणासाठी मफु कृवि, राहुरीने विकसित केलेले ट्रॅक्टर चलीत फुले बंदिस्त वाफे तयार करणारे अवजार वापरून ६ x २ मीटर आकाराचे वाफे तयार करावेत जेणेकरून पावसाचा पडणारा प्रत्येक थेंब अडवून जमिनीत जिरवला असता जमिनीतील ओलाव्यात वाढ होण्यास मदत होते.<br>• खरीप हंगामातील रिकाम्या (नापेर) जमिनीत चाऱ्यासाठी ज्वारी पिकाची पेरणी करावी.<br>• संरक्षित पाणी उपलब्ध असल्यास उभ्या पिकांना पाणी द्यावे.<br>• हुमणी कीड : हुमणीचे भुंगेरे सुर्यास्तानंतर बाभूळ , बोर, लिंब या झाडांवर पाने खाण्यासाठी गोळा होतात. अशा झाडांच्या फांद्या रात्री काठीच्या सहाय्याने हलवून खाली पडलेले भुंगेरे गोळा करावेत व रॉकेल मिश्रित पाण्यात टाकून मारावेत. हा उपाय शेतकऱ्यांनी सामुदायिकरित्या करावा. त्यामुळे अंडी घालण्यापूर्वीच भुंगेऱ्यांचा नायनाट होईल. हुमणी अळीच्या जैविक नियंत्रणासाठी मेटारिझीयम ॲनिसोप्ली परोपजीवी बुरशी २० कि. प्रति हेक्टर जमिनीत मिसळावे (शेणखतामध्ये मिसळून टाकता आल्यास उत्तम).<br>• सर्व उभ्या पिकांना ढगाळ हवामानामुळे किड व रोगाचा प्रादुर्भाव आढळून आल्यास फुले बायोमिक्स ची फवारणी पेरणीनंतर ३० दिवसांनी १० मिली प्रति लिटर पाणी प्रमाणे करावी. तसेच सूक्ष्म अन्नद्रव्याची कमतरता असल्यास पेरणीनंतर ३५ दिवसांनी फुले ग्रेड II ची पहिली फवारणी ५ मिली प्रति लिटर पाणी प्रमाणे करावी.<br>• गरजेप्रमाणे आंतरमशागत निंदणी/कोळपणी करून पिक तण विरहित ठेवावे.<br>• हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामा नाच्या पूर्वानुमाना करिता 'मेघदुत' मोबाईल ॲपचा वापर करावा. मेघगर्जना व विजेच्या पूर्वानुमानाकरिता 'दामिनी' मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• कृषिविषयक माहितीसाठी, महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कृषिदर्शनीचा आणि सद्यस्थितीचा विचार करता आपत्कालीन पीक नियोजन पुस्तिकेचा एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग करावा. |
| तूर + कोथिंबीर | पेरणी | आपत्कालीन पीक नियोजनासाठी बाजरी पिकामध्ये करावयाचा बदल तूर + कोथिंबीर (१:२) या प्रमाणात पेरणी योग्य पाऊस झाल्यास वापसा येताच बीजप्रक्रिया करून पेरणी करावी. |

| | | |
|---|---|---|
| **बाजरी** | पेरणी | ऑगस्ट च्या पहिल्या पंधरवड्यात आपत्कालीन पीक नियोजन उशिरा पेरणीसाठी पुरेसा ओलाव्यावर पेरणी बीजप्रक्रिया करून उरकून घ्यावी. |
| **चवळी** | पीक वाढीची अवस्था | रस शोषणाऱ्या किडींच्या नियंत्रणासाठी , प्रति लिटर पाण्यामध्ये ५ ग्रॅम या प्रमाणात 'लेकॅनिसिलियम लेकॅनी' (पूर्वीचे 'व्हर्टिसिलियम लेकॅनी') या जैविक बुरशीनाशकाचे मिश्रण फवारावे. |
| **ऊस** | पीक वाढीची अवस्था | खोड किडीच्या जैविक नियंत्रणासाठी ट्रायकोग्रामा चिलोनिस (ट्रायकोकार्ड) ५ ते ६ ट्रायकोकार्ड १५ दिवसाच्या अंतराने प्रति हेक्टरी वापरावे तसेच ५ कामगंध सापळे (इ.एस.बी. ल्यूर) प्रति हेक्टरी वापरावे. |
| **सुर्यफुल** | पीक वाढीची अवस्था | सूर्यफूल पिकातील शेंडे मर (Bud Necrosis) हा रोग रस शोषणाऱ्या किडीं मुळे होतो त्या च्या नियंत्रणासाठी ईमिड्याक्लोप्रीड १७.८ एस. एल. २ मिली प्रति १० लिटर पाण्यामधून फवारणी करावी. |
| **मुग/उडीद** | पीक वाढीची अवस्था | शेतातील रोगग्रस्त झाडे उपटून टाका आणि ती नष्ट करा वीत. गरजेप्रमाणे आंतरमशागत निंदणी/कोळपणी करून पिक तण विरहित ठेवावे. रस शोषणाऱ्या किडींच्या नियंत्रणासाठी, ५ % निंबोळी अर्काची फवारणी करावी आणि प्रति एकर ८ ते १० पिवळे चिकट सापळे वापरावेत. |
| **तूर** | पीक वाढीची अवस्था | उगवणपश्चात २० ते ३० दिवसानंतर इमॅझीथायपर १०% एस.एल. २ मिली. प्रति लीटर पाणी तणनाशकाची फवारणी करावी. |
| **केळी** | पीक वाढीची अवस्था | लागवडीसाठी कंद मुनवे निरोगी आणि जातिवंत बागेतूनच निवडावे. केळी लागवडीच्या वेळी ॲझोस्पिरीलम - २५ ग्रॅम व पी.एस.बी.-२५ ग्रॅम/ झाड, शेणखतात मिसळून द्यावीत तसेच गंधक २० ग्रॅम शेणखतात आठवडाभर मुरवून (१:१० प्रमाणात) प्रति झाड दोन समान हप्त्यात लागवडीच्यावेळी व लागवडीनंतर १६५ दिवसांनी द्यावे. वादळी वाऱ्यापासून बागेच्या संरक्षणासाठी सजीव कुंपणाचा वापर करावा. |
| **सिताफळ** | पीक वाढीची अवस्था | सिताफळातील पिठ्या ढेकूण या किडीच्या नियंत्रणासाठी लेकेनोसिलियम लेकॅनी (व्हर्टीसिलियम लेकॅनी) हे जैविक बुरशीनाशक ५ ग्रॅम अधिक फिशऑईल रोझीन सोप ५ ग्रॅम किंवा मेटारायझीयम ५ ग्रॅम आणि ५ मिली दुध प्रति लिटर पाणी याप्रमाणात आर्द्रतायुक्त हवामान असताना फवारणी करावी. |
| **डाळिंब** | पीक वाढीची अवस्था | सततचा पाऊस, हवेतील जास्त आर्द्रता आणि ढगाळ वातावरणामुळे फुलकिडे ( Thrips) आणि फळ पोखरणारी अळी (Fruit Borer) किडींचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असल्याने सायँट्रानिलीप्रोल १०.२६% OD (१मिली/लि) किंवा लॅम्ब्डा-सायहेलोथ्रिन ०४.९०% CS (१मिली/लि ) किंवा ब्रोफ्लानिलाईड २०% SC (२.५मिली/१०लि )चा शिफारसीनुसार फवारणीसाठी वापर करावा. पिठ्या ढेकूण (Mealybug) व खवले कीडीच्या नियंत्रणासाठी क्विनालफॉस २५% EC (३ मिली/लि) ची फवारणी करावी. किडींची आर्थिक नुकसान पातळी पाहूनच फवारणी करावी. |
| **जनावरांचे व्यवस्थापन** | | ऑगस्ट महिन्यात जनावरांना लाळ्या खुरकूत ( FMD), घटसर्प (HS) आणि फऱ्या (BQ) या रोगांवर लसीकरण करणे अत्यंत महत्त्वाचे असते. महाराष्ट्रात १३ ऑगस्ट २०२६ पासून लाळ्या खुरकूत प्रतिबंधक लसीकरणाची नववी फेरी सुरू होत आहे. या मोहिमेत सर्व पशुपालकांनी आपल्या पशुधनाचे लसीकरण करून घ्यावे.<br>स्वच्छ दुध उत्पादनासाठी महत्वाचे उपाय : जनावरांचा गोठा आणि दुध काढण्याची जागा शक्यतो वेगळी ठेवावी. जनावरांची कास, शेपटी व शरीर दुध काढण्यापुर्वी नीट स्वच्छ करावी. दुध काढताना हात व भांडी निर्जंतुक असावीत. संपुर्ण मुठ पद्धतीने ७-८ मिनिटात दुध काढावे. दूध गाळून थंड पाण्यात किंवा बर्फात साठवावे व लवकर विक्रि करावी. |

***टिप : शेतकरीबंधूनी किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्य ती खबरदारी/ काळजी धेऊन किसान कवच बॉडीसूटचा वापर करावा.**

**स्त्रोत : १) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.**
**२) मागील हवामान : -**
**ठिकाण : कृ.म.वि., पुणे . दि. : ०४.०८.२०२६**

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे,ऐएमएफयु, पुणे तथा**
**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**